# सेवापूर्ती व गुणगौरव समारंभ संपन्न

जानेवारी, २००८ या महिन्यामध्ये महापालिकेच्या सेवेतून एकूण ३९ सेवक सेवानिवृत्त झाले. त्यामध्ये वयपरत्वे २६ व ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतलेले १३ सेवक होते. या सेवकांचा सेवापूर्ती समारंभ व महापालिकेच्या सेवेत असताना विशेष कामगिरी बजावलेल्या व पुरस्कार प्राप्त झालेल्या अधिकारी/सेवकांचा गुणगौरव समारंभ दिनांक ३१/१/०८ रोजी कॅ.वडके हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. या समारंभास प्रमुख पाहुणे मा.शाम देशपांडे, सदस्य व गटनेते, शिवसेना, पुणे मनपा हे उपस्थित होते. या समारंभामध्ये सेवानिवृत्त झालेल्या सेवकांना शॉल व स्मृतिचिन्ह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमामध्ये मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त यांना कार्यक्षम प्रशासकीय अधिकारी पुरस्कार व उच्चश्रेणी लघुलेखक श्री.पुरंदरे यांना पांडित्य पुरस्कार मिळाल्याबद्दल दोघांचाही विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, रखवालदार सेवक श्री.अशोक जाधव यांची सुकन्या कु.जागृती अशोक जाधव हीस राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत कोलाज विषयात प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने तिस पुस्तक व पेनसेट देवून गौरविण्यात आले.त्याचप्रमाणे अग्निशामक दलाकडील फायर इंजिन ड्रायव्हर यांना मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांचे वतीने गुणोत्कृष्ट अग्निशमन सेवा पदक जाहीर झाल्याबद्दल आणि फायरमन श्री.अंबरिश बत्तुल यांनी अपघातग्रस्त महिलेस मदत करुन तिचे प्राण वाचविल्याबद्दल दोहोंचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे महापालिका क्रिकेट संघातील क्रिकेटपटु सर्वश्री निलेश शेरु चव्हाण व लक्ष्मीकांत शिंदे यांची महाराष्ट्र प्रौढ क्रिकेट राज्यस्तरीय संघामध्ये निवड झाल्याबद्दल त्यांचाही शॉल, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.अरुण खिलारी, कामगार कल्याणाधिकारी यांनी केले व मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मा.जगताप यांनी सेवानिवृत्त सेवकांनी आपल्या अनुभवाच्या शिदोरीद्वारे महापालिका प्रशासनास कायमस्वरुपी मार्गदर्शन करुन प्रशासनाच्या लोकसहभाग या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.शाम देशपांडे यांनी सेवानिवृत्त सेवकांना आपल्याजवळील आर्थिक पुंजी आपल्यासाठीच राखीव ठेवून वापरावी आणि आपल्या हातून समाजकार्य व्हावे अशी अपेक्षा मार्गदर्शनपर भाषणात व्यक्त केली.

या कार्यक्रमामध्ये मा.मोळक, उप आयुक्त यांनी सत्कारास उत्तर देताना महापालिका सेवेतून अधिकारी आणि सेवक मोठ्या प्रमाणावर ऐच्छिक सेवानिवृत्ती घेत आहेत ही बाब प्रशासनाने गांभीर्यपूर्वक घेणे आवश्यक आहे. या ऐच्छिक निवृत्तीच्या मूळ कारणांचा विचार करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा.शिवाजी दौंडकर, कामगार कल्याणाधिकारी यांनी केले व आभार प्रदर्शन श्री.जयवंत शिंदे यांनी केले.

# राष्ट्रपती पदक विजेत्या कर्मचाऱ्याचे अपघाती निधन

महापालिकेच्या अग्निशामक दलाकडील फायर इंजिन ड्रायव्हर ज्ञानेश्वर तुकाराम खेडेकर यांचे दिनांक ९/२/२००८ रोजी मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे पुणे दौऱ्यातील सुरक्षा व्यवस्थेसाठी खुबवलीकडे जात असताना पिरंगुटजवळ अपघाती निधन झाले. कै. खेडेकर यांना ५८ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मा. राष्ट्रपती यांनी गुणोत्कृष्ट अग्निशमन सेवा पदक जाहीर केले होते. सदर राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याच्या आनंदात असतानाच खेडेकर यांच्यावर मृत्यूने घाला घातला. कै.खेडेकर हे अत्यंत प्रामाणिक, मितभाषी आणि प्रसंगी जीवाची बाजी लावून कामगिरी करणारे कार्यक्षम सेवक म्हणून सहकाऱ्यांमध्ये परिचित होते. अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असताना त्यांना वेळोवेळी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीप्रित्यर्थ अनेक पदके व पुरस्कार मिळाले आहेत. विशेषत: मंगळवार पेठ येथील पेट्रोलपंपास लागलेल्या आगीमध्ये प्रसंगावधान राखून गॅसने भरलेला टँकर बाजूला घेवून केलेल्या प्रशंसनीय कामगिरीमुळे मोठा अनर्थ टळला. या कामगिरीबाबत कै.खेडेकर यांचे सर्व स्तरावर कौतुक करण्यात आले होते. त्यांच्या निधनामुळे महापालिका व अग्निशामक वर्तुळामधील सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कै. खेडेकर यांच्या अकाली चटका लावून जाणाऱ्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबियांवर गुदरलेल्या दु:खद प्रसंगी मनपा प्रशासनामार्फत अनुक्रमे खेडेकर यांच्या मुलास मनपामध्ये अनुकंपा नेमणूक, कामगार कल्याण निधीमार्फत रु.१५,०००/- अनुदान व पुणेकरांतर्फे रु.२.७५ लाखाची आर्थिक मदत करुन सर्वजण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे सक्रीय आधार देवून उभे राहिले आहेत, हा एक वेगळा आविष्कार या प्रसंगी दिसून आला आहे.



## पगारपत्रक लेखनिकांसाठी महत्वाच्या सूचना

❖ . वेतनप्रदान अधिनियम, १९३६ मधील विहित तरतुदीनुसार संस्थेमधील सर्व कर्मचाऱ्यांना विहित कालावधीत वेतन आदा करणे बंधनकारक आहे. विलंबाने आदा केलेल्या वेतनावर १० पट दंड आकारला जावू शकतो.

❖ उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार कायदेशीर वजावटीशिवाय सेवकांच्या वेतनातून त्यांच्या लेखी संमतीशिवाय इतर वजावटी करता येत नाहीत. सर्वसाधारणपणे कर्मचाऱ्याच्या एकूण वेतनातून ५०% पर्यंत वजावटी अनुज्ञेय आहेत. सहकारी संस्थांच्या कर्जफेड असल्यास कमाल ७५% पर्यंत वजावटी करता येतात.

❖ किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार एखाद्या कर्मचाऱ्यास त्याच्या गैरवर्तनाबाबत त्यास एकुण पगाराच्या ३% पर्यंत दंड करता येवू शकतो.

❖ सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना नियत दिनांकास देय रकमा (शिल्लक रजा, भविष्य निर्वाह निधी, इत्यादी) देणे बंधनकारक आहे.

❖ सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन व देय रकमा प्रदान करण्यास सहा महिन्यांपेक्षा जास्त विलंब लागल्यास, उपदान व निवृत्ती वेतन रकमेवर सहा महिने पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या महिन्याच्या तारखेपासून दरवर्षी १०% दराने व्याज देण्याची तरतुद शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे.

❖ सेवानिवृत्ती प्रकरणे विहित मुदतीत निकाली काढणेसाठी मा.महापालिका आयुक्त वा मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी प्रसृत केलेल्या आदेश/सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

❖ कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील विविध नोंदी रजा हिशेब अद्ययावत ठेवून वेळीच संबंधितांची स्वाक्षरी घेण्यात यावी.

❖ सेवेत असताना मृत कर्मचाऱ्याच्या वारसास आणि मा.लाड कमिटीच्या शिफारशीनुसार देण्यात येणाऱ्या अनुक्रमे अनुकंपा तत्वावर व वारस नियुक्ती मिळण्याची मुदत एक वर्ष विहित करण्यात आली आहे.

❖ कामगार कल्याण निधीमार्फत देण्यात येणाऱ्या वारस अनुदानासाठी अर्ज करण्याची मुदत सहा महिन्यांपर्यंत आहे.

## जागृती जाधवचे यश

महापालिकेचे सुरक्षा सेवक श्री.अशोक काळुराम जाधव यांची सुकन्या कु.जागृती अशोक जाधव हिस राज्यस्तरीय चित्रकलेल्या कोलाज या विषयामध्ये प्रथम क्रमांकाचे विभागून पारितोषिक जाहीर झाले आहे. कु.जागृती मॉडर्न हायस्कुल, गणेशखिंड येथे इयत्ता आठवीमध्ये शिकत असून, अत्यंत लहान वयात केलेल्या स्पृहनीय कामगिरीबद्दल तिचे मॉडर्न हायस्कुल मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये कौतुक होत आहे. कामगार कल्याण निधीमार्फत कु.जागृती जाधवचे हार्दिक अभिनंदन.

## काटकसर

- पाणी वाचवून दुसऱ्याची तहान भागवा
- फुलझाडांना आवश्यक तेवढेच पाणी घाला
- काळाची गरज, पाणी काटकसरीने वापरा.

**कल्याणवार्ता**
फेब्रूवारी, २००८
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रविणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖
लीलाधर प्र.वाबळे
समन्वयक, मनुष्यबळ विकास कक्ष
तथा कार्यालय अधिक्षक
❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५
ईमेल आयडी
nandkumar.jagtap
@punecorporation.org
**फक्त खाजगी वितरणासाठी**
(विनामूल्य)